दिनांक ०६.०६.२०२६.

**प्रेस नोट**

१) लोकसेवक रामेश्वर अर्जुन रोडगे, वय ४३ वर्ष, व्यवसाय नौकरी, पद ग्राम महसुल अधिकारी, सज्जा खिल्लार, तहसिल कार्यालय सेनगाव, ता. सेनगाव, जि. हिंगोली रा. ह.मु. रामाकृष्णा पार्क, बळसोंड हिंगोली यांनी २२,०००/– रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती १४,०००/– रूपये लाचेची रक्कम पंचासमक्ष स्विकारल्याने त्यांचे विरूद्ध पोलीस स्टेशन नर्सी नामदेव, गु.रनं १२७/२०२६ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा दाखल केले बाबत.

---

दिनांक ०५.०६.२०२६ रोजी तक्रारदार यांनी तक्रार दिली की, तक्रारदार यांचे वडिलांचे नावे हक्कसोड वाटणीतुन आलेल्या वडिलोपार्जीत ०५ एक्कर शेतीचे फेर करून ७/१२ वर नाव लावण्यासाठी नमुद ग्राम महसुल अधिकारी (तलाठी) यांनी दिनांक ०२.०६.२०२६ रोजी तक्रारदार यांचेकडे २२,०००/– रूपयाची मागणी केली. नाईलाजास्तव म्हणुन तक्रारदार यांनी नमुद दिवशी आलोसे यांना ८०००/– रूपये दिले होते. उर्वरित १४,०००/– रूपये दिले तरच तक्रारदार यांचे वडिलांचे नावे वडिलोपार्जीत शेतीच्या फेरचे व्यवहार पुर्ण करणार असे म्हणुन आरोपी लोकसेवक लाचेची मागणी करत असले बाबत तक्रार कार्यालयास प्राप्त झाली.

दिनांक ०५.०६.२०२६ रोजी सेनगाव येथे लाच मागणी पडताळणी करण्याकरीता तक्रारदार यांना पंच क्रमांक १ यांचे सह लोकसेवक यांची भेट घेण्याकरीता रवाना केले. तेव्हा भेटीवेळी आरोपी लोकसेवक यांनी तक्रारदार यांचेकडे त्यांचे वडिलांना वडिलोपार्जीत हक्काने मिळालेल्या शेतीचे फेर व्यवहार पुर्ण करून ७/१२ वर नाव घेण्यासाठी यापुर्वी ८,०००/– रूपये घेतल्याचे मान्य केले. व तक्रारदार यांचेकडे उर्वरित १४,०००/– रूपये लाचेची मागणी करून लाच रक्कम स्विकारणार असे निष्पन्न झाले.

दिनांक ०५.०६.२०२६ रोजी सापळा कारवाई दरम्यान हिंगोली–सेनगाव रोडवरिल पुसेगाव फाटा परिसरात आरोपी लोकसेवक ग्राम महसुल अधिकारी (तलाठी) यांनी तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष १४,०००/– रूपये लाचेची रक्कम स्वत: स्विकारली असता, त्यांना लाचेच्या रकमेसह रंगेहात पकडण्यात आले त्यांचे विरूद्ध पोलीस स्टेशन नर्सी नामदेव, गुरनं १२७/२०२६ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम १९८८ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

सदरची कामगीरी मा. श्री श्रीकृष्ण कोकाटे, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो नांदेड, श्री विकास घनवट, पोलीस उपअधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली यांचे मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक, श्री राजेश मलपिलु, श्रीमती सुलभा राऊत, सपोउपनि महमद युनुस, विजय शुक्ला, पोह/भगवान मंडलीक, रविंद्र वरणे, राजाराम फुपाटे, गजानन पवार, गोविंद शिंदे, पो.शि. /शिवाजी वाघ, अमोल जाधव, सर्व अॅन्टी करप्शन ब्युरो यांचे मदतीने यशस्वीपणे पुर्ण केलेली आहे.

अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली तर्फे सर्व नागरीकांना आवाहन करण्यात येते की, कोणत्याही शासकिय कार्यालयामध्ये कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी अधिकारी/कर्मचारी किंवा त्यांच्या वतीने कोणी खाजगी इसम लाचेची मागणी करीत असल्यास अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय हिंगोली यांचेशी संपर्क साधावा. कार्यालयीन वेळेनंतर वा सुट्टीचे दिवशी अॅन्टी करप्शन ब्युरोचे कार्यप्रणाली बाबत वा तक्रारी बाबत माहिती पाहीजे असल्यास खालील नमुद क्रमांकावर संपर्क साधावा.

मा. श्रीकृष्णा कोकाटे, पोलीस अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो, नांदेड, मोबा. क्रमांक ९८२३४१०५०६.
श्री विकास घनवट, पोलीस उप अधिक्षक, अॅन्टी करप्शन ब्युरो हिंगोली, मोबा. क्रमांक ९८२२२५९९३२
टोल फ्रि क्रमांक १०६४, लॅन्ड लाईन क्रमांक ०२४५६–२२३०५५.
व्हॉटसअॅप क्रमांक :– ९३५९९१२८८८९/९४२२०६१०६४.

( राजेश मलपिलु )
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, हिंगोली.

CamScanner